**M.S. BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION,**
**NAGPUR DIVISIONAL BOARD, CIVIL LINES, NAGPUR**

दूरध्वनी कमांक :0712-2565403/2560209/2553401/2553360 FAX NO.0712-2561775, www.nagpureduboard.in
विभागीय अध्यक्ष : 2560319/2562766 msboardnagpur@gmail.comविभागीय सचिव : 2560319/2560166

पत्र क.नाविमं/स्टेना./43
नागपूर दिनांकः 24/03/2020

प्रति,

मुख्याध्यापक /प्राचार्य
सर्व मान्यता प्राप्त,
शाळा / कनिष्ठ महाविदयालय,
नगपूर विभाग ,नागपूर

विषयः– फेंब्रुवारी / मार्च 2020 माध्यमिक शालांत प्रमाणपत्र प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेच्या उत्तर पत्रिका शिक्षकांना घरी तपासणी साठी देण्याबाबत.

संदर्भः–1) राज्यमंडळ पत्र कमांक रा.मं./परीक्षा–2/2406, दि.23/03/2020.

उपरोक्त विषयाच्या अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, फेंब्रुवारी / मार्च 2020 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा दिनांक 18 फेंब्रुवारी 2020 ते दिनांक 18 मार्च 2020 या कालावधीत व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षा दिनांक 03 मार्च 2020 ते दिनांक 23 मार्च 2020 या कालावधीत आयोजीत करण्यात आली होती. त्या पैकी दिनांक 23 मार्च 2020 रोजीचा इयत्ता 10 वीचा समाजशास्त्र भाग –2 (भुगोल) या विषयाची लेखी परीक्षा शासन आदेशानुसार स्थगित करण्यात आली आहे.

उत्तरपत्रिका मुल्याकंन व नियमन करण्यासाठी पुर्वी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांच्या नावने उत्तरपत्रिकांचे पार्सल पाठविण्यात येत होते. उत्तर पत्रिका परीक्षण व नियमणाचे काम परीक्षक व नियामक यापुर्वी घरी करत असत सदर पद्धती मध्ये गोपनीयता राखली जात न्हवती व गैरप्रकार होण्याची शक्यता विचारात घेता अशा गोष्टिंना आळा बसण्यासाठी उत्तरपत्रिका मुल्यांकन व नियमणाच्या कामामध्ये गोपनीयता राखण्यासाठी तसचे उत्तरपत्रिका तपासणाच्या कामामध्ये विलंब होउ नये यासाठी सदरहू काम नियुक्त परीक्षक व नियामक कार्यरत असलेल्या शाळा व कनिष्ठ महाविदयालयांमध्ये करण्याची कार्यपध्दती सर्व विभागीय मंडळामध्ये ऑक्टोबर 2007 परीक्षेपासुन ही योजना सर्व विभागीय मंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

उत्तरपत्रिका परीक्षक व नियामक यांच्या घरी तपासणीस दिल्यास उत्तरपत्रिका गाहाळ / खराब होण्याची शक्यता , गोपनीयतेचा भंग व सुरक्षितता तसेच निर्धारीत वेळेत उत्तरपत्रिका तपासून न होण्याची शक्यता व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दिनांक 10 जुन पुर्वी परीक्षांचे निकाल जाहिर करण्यात येणाऱ्या संभाव्य अडचणी या सर्व बाबी लक्षात घेता विकेंद्रीत केंद्रीय मुल्यमापन योजना अवलंबूनच उत्तरपत्रिका तपासणी होणे आवश्यक आहे असे शासनास राज्य मंडळामार्फत सादर करण्यात आले आहे.

मात्र राज्यात करोना आजाराचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना सुट्टी जाहिर करण्यात आली आहे. त्यामुळे शाळेत येऊन उत्तर पत्रिकांचे परीक्षण व नियमन करण्यात अडचणी येत आहेत.

सदरहू पार्श्वभूमि विचारात घेता व उपरोक्त दोन्ही परीक्षांचे निकाल वेळेत लागणे आवश्यक असल्याने खास बाब म्हणून केवळ या परीक्षेच्या उत्तरपत्रिका पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहुन माध्यमिक व कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षकांना परीक्षण व नियमनासाठी घरी देण्याचे शासनाकडुन प्राप्त झालेल्या आदेशानुसार मान्यता देण्यात येत आहे.

# M.S. BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION,
## NAGPUR DIVISIONAL BOARD, CIVIL LINES, NAGPUR

दूरध्वनी कमांक :0712-2565403/2560209/2553401/2553360 FAX NO.0712-2561775, www.nagpureduboard.in
विभागीय अध्यक्ष : 2560319/2562766 **msboardnagpur@gmail.com**विभागीय सचिव : 2560319/2560166

1. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा फेंब्रुवारी मार्च 2020 च्या उत्तर पत्रिका परीक्षण व नियामनासाठी शिक्षकांना त्यांच्या घरुन तपासण्यास केवळ या परीक्षेपूर्ती अनुमती दण्यात येत आहे.
2. सदर उत्तरपत्रिका मोजुन व सुस्थितीत असल्याची खारतजमा करुन शिक्षकांनी मुख्याध्यापकांकडुन / कनिष्ठ महाविदयालयाच्या संबधित प्रमुखांकडुन ताब्यात घ्याव्यात.
3. उत्तरपत्रिकांचे परीक्षण व नियमन घरातुन करतांना त्याची पुर्णतः गोपनीयता व सुरक्षिता राखली जाईल याची संबधित शिक्षकांनी दक्षता घ्यावी.
4. उत्तरपत्रिकांचे परीक्षण / नियमन वेळेत पुर्ण करुन त्या विहित पद्धतीने गोपनीयता व सुरक्षितता विचारात घेवून संबधितांकडे हस्तांतरीत कराव्यात.
5. आपल्याकडील उत्तरपत्रिका खराब होणार नाही अथवा गहाळ होणार नाही याची सर्वातोपरी दक्षता घ्यावी.

तरी फेंब्रुवारी / मार्च 2020 माध्यमिक शालांत प्रमाणपत्र प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेच्या उत्तर पत्रिका शिक्षकांना घरी तपासण्यासाठी देण्यासंदर्भात उपरोक्त अटी–शर्ती विचारात घेवून शालेय स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी.

(रविकांत देशपांडे)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

प्रतिलिपीः–
1.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पूणे यांना त्यांचे संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव.
2.विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3.शिक्षणाधिकारी (माध्य),जिल्हा परिषद, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली व गोंदिया यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित आपण आपले स्तरावरुन उत्तरपत्रिका तपासणी बाबत उपरोक्त नुसार सर्व संबधितांना लेखी कळवावे.